# बालशिक्षण कायदा

महाराष्ट्र शासनाने १९९६ सालचा 'पूर्वप्राथमिक वर्ग प्रवेशनियमन कायदा, ' आठ ऑगस्ट २००० ला रद्द केला आहे. ही एक चांगली गोष्ट असून महाराष्ट्र शासन यासाठी अभिनंदनास पात्र आहे. जन्माला येतानाच मुळी दुर्बल अवस्थेत नि अपुया तयारीने हा कायदा करण्यात आला होता. जन्माला आल्यापासून तो आजारीच होता. या कायद्याचे पालन फारसे कोणी केले नाही; आणि तसे पालन काटेकोरपणे करवून घेणेही सरकारच्या संदर्भित खात्याला जमले नाही. बालवर्गातील प्रवेशाविषयीच्या नियमांबरोबरच बालशाळांना प्रत्येकी पाचशे रूपये भरून नोंदणी सक्तीची ठरविली होती. एवढ्या मोठया रकमेची नोंदणी-फी ही जाचक होतीच; शिवाय मोठया संख्येने बालशाळा चालविणा -या स्वेच्छासंस्थांचा उत्साहभंग करणारीही होती. ज्या काही थोडया पापभिरू संस्थांनी शासनाकडे पैसे भरून आपली नोंदणी केली असेल, त्यांना मात्र हा कायदा रद्द होण्यामुळे आपले पैसे फुकट गेल्याचे दुःख होईल. शासनाने अशा संस्थांचे पैसे परत करणे नैतिकतेचे ठरेल.

बालशाळांतील प्रवेशाचे विनियमन करणाऱ्या या कायद्यापूर्वी, शासनाने याविषयीचे परिपत्रक काढले होते. देणग्या घेण्यास प्रतिबंध, मुलांच्या किंवा त्यांच्या पालकांच्या मुलाखती घेण्यास शाळांना बंदी घालण्याचा इरादा, या परिपत्रकाने संबंधितांना जाहीर केला होता. परंतु त्याची फारशी दखलही कोणी घेतली नव्हती. शिक्षणसंस्थांनी देणग्रा घेण्यास प्रतिबंध करणारा कायदाही अनेक वर्षे अस्तित्वात आहे. हा  कायदा इतर संस्थांप्रमाणेच बालशाळांनाही, अर्थातच लागू आहे. परंतु वास्तवात शेकडो संस्था कायद्याची पायमल्ली करीत असूनही कधी कुणाला यासाठी शिक्षा झाल्याचे ऐकिवात नाही. एखाद्या बाबतीत कायदा करण्याची तल्परता दाखविली गेली तरी त्याच्या अंमलबजावणीची तीव्रता आढळत नाही. त्यामुळे शासनाची आणि कायद्याचीच विश्वासार्हता हरवत आहे की काय, अशी शंका येऊ लागली आहे.

बालशाळांतील प्रवेशाबाबतचा कायदा करण्यात आल्यावर, त्याबाबत अत्यंत अशा संख्येने प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. तीच परिस्थिती, पुढील वर्षी, त्या कायद्यास एक वर्षाची स्थगिती दिल्यानंतर किंवा त्यानंतरच्या वर्षी, त्याला अनिश्चित काल स्थगिती दिल्यानंतर होती. जनमानसात बालशिक्षणाचे क्षेत्र अत्यंत दुर्लक्षित असल्याचेच हे निदर्शक होते. सरकार आता, वृत्तपत्रांतील बातम्यांत म्हणते त्याप्रमाणे, पालकवर्गाचा या कायद्यास मोठा विरोध झाला असल्याचे चित्र दिसले नव्हते. एकूणच पालकवर्ग बालशिक्षणाविषयी म्हणजे त्याच्या दर्जाविषयी किंवा शास्त्रीयतेविषयी विलक्षण उदासीन अथवा अनभिज्ञ असल्यामुळे त्याच्याकडून नकारार्थी वा होकारार्थी, कोणत्याच प्रतिक्रिया उमटणे अपेक्षितच नव्हते, तशा त्या फारशा उमटल्याही नाहीत.

या कायद्याला तत्परतेने विरोध केला तो मात्र काही मिशनरी शिक्षणसंस्थांनी. बालशिक्षणाच्या क्षेत्रातील या संस्थांचे कार्य काही वाखाणण्यासारखे खासच नाही.

शास्त्रशुध्द् बालशिक्षण करण्यापेक्षा, प्राथमिक शिक्षण बालशाळेच्या स्तरावर खाली खेचून पालकांनी आणि पर्यायाने समाजाची बालशिक्षणाबाबतची समजूत बिघडण्यात इतर, काही संस्थांप्रमाणे याही संस्थांचा वाटा मोठा आहे. अशा संस्थांना, बालशिक्षण शास्त्रीय मार्गाने नेण्यास उद्युक्त करण्यासाठीच, खरे तर, एखाद्या

चांगल्या बालशिक्षणविषयक कायद्याची गरज आहे. असे असताना, या संस्थांच्या विरोधास नमून, शासनाने आपण केलेल्या कायद्यास स्थगिती देणे, हे भित्रेपणाचे अथवा हितसंबंधी लांगूलचालनाचे लक्षण ठरते. अशाच कृतींमधून शासनाची विश्वासार्हता कमी होत असते.

या कायद्याला अल्पसंख्यांकांच्या संस्थांनी विरोध केला तो म्हणे, या संस्थांच्या हक्कांवर गदा येते म्हणून. त्यांच्या घटनात्मक हक्कांवर आक्रमण होते म्हणून. वास्तविक शासनाने आपल्या कायद्याला स्थगिती दिली तेव्हा हा मुद्दा तपासलाच नाही. नंतर अल्पसंख्याकांच्या संस्थांनी हे प्रकरण मुंबईला उच्च न्यायालयात नेले. तेव्हा त्यांच्या घटनात्मक हक्कांवर खरेच आक्रमण होते आहे किंवा कसे हे शोधण्याची एक संधी आली होती. आपल्या कायद्याचे समर्थन करायची संधीही शासनाला मिळाली होती. कायद्याची घटनात्मक शाहनिशा झाली असती, तर ते सर्वांनाच उपयुक्त ठरणार होते.

परंतु आपला कायदा आपणच मागे घेऊन ही संधी शासनाने गमावली. घटनात्मक प्रश्न उपस्थित केले गेले तर त्याची न्यायालयांकडून उत्तरे मिळणे आवश्यक असते. ते पुढील काळाला दिशादर्शक ठरत असते. पण बालशिक्षणविषयक या कायद्याच्या बाबतीत हे घडले नाही.

बालशिक्षणाबाबतच्या या पूर्वप्राथमिक वर्ग प्रवेशनियमन कायद्या' चा संबंध, महाराष्ट्र शासनाने १९९५ साली नेमलेल्या, प्रा.राम जोशी यांच्या अध्यक्षतेखालील 'राज्यस्तरीय बालशिक्षण समिती' शी जोडला जातो. हे थोडेसे बरोबर आणि थोडेसे चूकही आहे.

या विधानाच्या स्पष्टीकरणासाठी, या कायद्याची पार्श्वभूमी पाहणे उपयुक्त ठरते.

शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे उद्दिष्ट समोर ठेवून महाराष्ट्र बालशिक्षण परिषद राज्यव्यापी संस्थेची स्थापना १५ नोव्हेंबर १९९४ या दिवशी झाली. आपल्या स्थापना अधिवेशनातच, या संस्थेने, शासनासाठी तीन ठराव केले होते. एका ठरावान्वये यश पाल समितीचा अहवाल( शिक्षणाचे ओझे ) महाराष्ट्र शासनाने स्वीकारावा अशी मागणी केली होती.

अत्यंत विस्कळीत अशा बालशिक्षण क्षेत्राला, त्याच्या अंगभूत महत्त्वानुसार वळण प्राप्त व्हावे यासाठी, शासनाने व्यापक धोरण ठरवावे याचा आग्रह धरणारा, दुसरा ठराव होता. तिसरा ठराव होता तो, याकरिता अशासकीय तज्ज्ञांची समिती नेमून शिफारसी मागवाव्यात यासाठी होता. हे ठराव सादर करणाऱ्या, महाराष्ट बालशिक्षण परिषदेच्या सदस्यांना तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी या ठरावांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आणि ते तत्परतेने पाळलेही.

प्रा. राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली, महाराष्ट्र शासनाने , ऑगस्ट १९९५ मध्ये, राज्यस्तरीय बालशिक्षण समितीनियुक्त केली. या समितीकडेच परिषदेने मागणी केलेला यश पाल समितीच्या अहवाल - स्वीकृतीच्या मुद्दाही सोपविण्यात आला. समितीने ज्या विषयांवर शिफारसी द्यावयाच्या होत्या, त्यांची कार्यकक्षाही शासनाने निश्चित केली होती. एकूण दहा मुद्द्यांवर समितीने शिफारसी देणे अपेक्षित होते. ते मुद्दे असेः

१) सहा वर्षे वयापेक्षा कमी वय असलेल्या मुलामुलींसाठी पूर्वप्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे,

२)पूर्वप्राथमिक शिक्षणाबाबत वयोमर्यादा निश्चित करणे,

३)पूर्वप्राथमिक शिक्षणसंस्थांमध्ये देणग्यांबाबचे नियम प्रस्थापित करणे,

४) पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी प्रवेशाची कार्यपद्धती ठरवणे

५) पूर्वप्राथमिक स्तरावरील शिक्षणाचे स्वरूप ठरविणे,

६) पूर्वप्राथमिक अभ्यासक्रम निश्चित करणे,

७) पूर्वप्राथमिक स्तरावर नियुक्त करावयाच्या शिक्षकांची अर्हता निश्चित करणे,

८) पूर्वप्राथमिक स्तरावर शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी सेवाशर्ती निश्चित करणे,

९) पूर्वप्राथमिक शाळांसाठी किमान शैक्षणिक साहित्य निश्चित करणे आणि

१०) बालशिक्षणाच्या अंमलबजावणीच्या संदर्भात करावयाची कार्यवाही निश्चित करणे.

राज्यस्तरीय बालशिक्षण समितीने खूपच खोलवरचा व सविस्तर अभ्यास करून या सर्वच मुद्द्यांच्या संदर्भात आपल्या शिफारसी, त्यांच्या पूर्ण समर्थनासह, आपल्या अहवालात मांडल्या. त्याचबरोबर या क्षेत्राच्या गरजेनुसार आवश्यक अशा मुद्द्यांच्या संदर्भात स्वतःहूनही काही शिफारसी केल्या. एवढेच नव्हे तर, बालशिक्षणविषयक धोरण आखावयाचे असल्यास त्यामागे नेमका दृष्टिकोन काय असावा, त्याची मार्गदर्शक चौकट कशी असावी याचाही समावेश आपल्या अहवालात केला. प्रथमच बालशिक्षण विषयक व्यापक विचार करणारा एक चांगला अहवाल शासनाच्या दप्तरी दाखल झाला.

लोकशाही राज्यातील शासननियुक्त समितीच्या आणि बालशिक्षणासारख्या सर्वसंबंधित अशा विषयावरील हा अहवाल शासनाने सर्व लोकांसमोर खुला करावयास हवा होता.

संबंधित व्यक्ती व संस्था यांना, याविषयी मतप्रदर्शनाची संधी द्यावयास हवी होती. अहवाल प्रसिद्ध करून शासनाने तो समाजास उपलब्ध करून द्यावयास हवा होता. निदान त्यांतील शिफारसी तरी, अहवाल शासनाला सादर केला गेल्यानंतर, लगेच प्रसिद्ध करावयास हव्या होत्या. हे शासनाने केले नाही, ही शासनाची गंभीर चूक होती. शासनाने अहवाल अथवा त्यातील शिफारसी प्रसिद्ध न केल्यामुळे त्याविषयी उगीचच गुप्ततेचे वलय निर्माण झाले आणि शंकांचे काहूरही माजले.

_दुसरे असे की, या शिफारसींवर आधारित असे धोरण ठरवताना व तत्संबंधी कायदा करताना, हा विषय विधानसभेत सदस्यांच्या चर्चेसाठीही आणायला हवा होता. शासनाच्या निर्णयांच्या संदर्भात हल्ली एक अनिष्ट प्रथा पडू लागली आहे; व ती लोकशाहीस निखालस मारक आहे. ती अशी की, महत्त्वाचे निर्णय कायदेमंडळाकडून घेतले न जाता मंत्रिमंडळाकडून म्हणजे कार्यकारी मंडळाकडून घेतले जात आहेत.

वास्तविक कायदे करण्याचे अधिकार कायदेमंडळाचे असून, केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याचे व तत्संबंधी शासकीय निर्णय घेण्याचे काम मंत्रिमंडळाचे व त्यांच्या सचिवालयाचे आहे.

बालशिक्षणाबाबत राज्यस्तरीय समितीच्या सर्व शिफारसी स्वीकारल्याचे मुख्यमंत्र्यांनी व शिक्षणमंत्र्यांनी जाहीर केले, तरीही या शिफारसी काय आहेत आणि राज्यस्तरीय समितीने त्या कोणत्या तात्त्विक व व्यावहारिक पायांवर मांडल्या आहेत, या गोष्टी लोकप्रतिनिधींसमोर आणल्याच गेल्या नाहीत.

त्यामुळे कायदे करण्याचे अधिकार असलेली ही मंडळी याबाबत अनभिज्ञच राहिली.

तिसरी बाब अशी की, शासनाने बालशिक्षणविषयक व्यापक धोरण ठरवावे ही जी अपेक्षा, राज्यस्तरीय समितीच्या स्थापनेमागे होती, त्याला शासनाने काहीच प्रतिसाद दिला नाही. लोकचर्चेच्या आधारावर असे धोरण ठरणे, ही कायद्याची योग्य अशी पार्श्वभूमी ठरली असती. पण तसेही काही शासनाने केलेले नाही.

फक्त चौथी आणि सर्वाधिक महत्त्वाची बाब अशी की, राज्यस्तरीय समितीने चौदा-- पंधरा शिफारसी सादर केल्या असूनही शासनाने, त्यांना सामावून घेणारा असा सर्वांगीण कायदा न करता, त्यातील एका शिफारसीविषयी - पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी प्रवेशाची कार्यपद्धती ठरविण्याबाबत कायदा केला. म्हणजेच अत्यंत अपुरा असा कायदा केला. बाकीच्या शिफारसी या बालशिक्षणाच्या संदर्भात कितीतरी अधिक महत्त्वाच्या आहेत. त्यांना डावलून एकच मुद्दा निवडण्याचे कारणही शासनाने कधी स्पष्ट केलेले नाही.

बालशाळेतील प्रवेशाची कार्यपद्धती ठरविताना, राज्यस्तरीय समितीने काय म्हटले आहे हेही लोकांसमोर आले पाहिजे. की विशिष्ट शिफारस काय किंवा इतरही शिफारसी काय, त्या देताना समितीने सदैव — बालकेंद्री दृष्टिकोन ' पुढे ठेवला आहे. या दृष्टिकोनातून बालकाच्या बालशाळेतील 'प्रवेशा'चा विचार व्हायला हवा. राज्यस्तरीय समितीने म्हटले आहे, "बालशाळेतील प्रवेश ही बालकाची कुटुंबाबाहेरील संस्थात्मक शिक्षणाशी पहिली ओळख असते.

येथील त्याचा प्रवेश काहीतरी आत्मसात करण्यासाठी, काहीतरी शिकण्यासाठी असतो. मूल शिकण्यासाठी म्हणून जेव्हा पहिल्यांदाच शाळेत प्रवेश करीत असते, त्यावेळी त्याच्याकडून पूर्व तयारीची अपेक्षा करणे, हे तर्कसंगत वाटत नाही. अधिक सुरक्षित आणि ओळखीच्या वातावरणातून बाहेर पडून अनोळखी वातावरणात प्रवेश करीत असताना त्याची मुलाखत घेणे, त्याची परीक्षा घेणे हे अल्पवयीन मुलावर अन्याय करण्यासारखे आहे. तसेच काही शिकण्यापूर्वीच परीक्षा घेणे हेही तर्कसंगत नाही. शिवाय बालशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा आग्रह धरीत असताना प्रत्येक बालकास घराजवळ अशी शाळा, शिक्षणाची सोय व संधी मिळणे हा त्याचा मूलभूत हक्क मानला पाहिजे. असे असूनही आज बालकांचा बालशिक्षणातील प्रवेश हाच एक उग्र प्रश्न, विशेषतः शहरी बालशाळांतून, काही संबंधित मंडळींनी कृत्रिमरित्या निर्माण केलेला आहे.

लांबवरच्या शाळांतून प्रवेश घेणाऱ्या बालकांवर तर शाळेपर्यंतच्या प्रवासाचा जादा बोजा अल्पवयात टाकून वाहतुकीचे, प्रदूषणाचे आणि मुलांच्या गर्दी - धोक्यांचे ताण बालकांच्या (आणि पालकांच्याही) मनात निर्माण केले जात आहेत. आनंददायी बालशिक्षणाच्या मार्गातील प्रवेश, मुलाखती, शाळेपर्यंतचा प्रवास, प्रवासात जाणारा अनाठायी वेळ, या आजच्या प्रमुख अडचणी आहेत".

जर विस्तार असलेला हा परिच्छेद येथे देण्यात हेतू असा आहे की, राज्यस्तरीय समितीची यामागची बालकां बाबतची कळकळ ध्यानात यावी. शाळा - शिक्षण यांचा विचार करताना, राजकीय, आर्थिक अशा कोणत्याही बाबींपेक्षा 'बालका'चा विचार हा प्रधान असला पाहिजे.

राज्यस्तरीय समितीचा संपूर्ण अहवाल, सर्व शिफारसी याच दिशेने मांडलेल्या आहेत. शासन काय किंवा कायद्याला विरोध करू पाहणाऱ्या अल्पसंख्यांकांच्या संस्था काय, त्यांनी कुणीच आपल्या विचाराचे वळण या दिशेने नेलेले आढळत नाही. राज्यस्तरीय समितीने आणखी एक गोष्ट केली आहे.

त्यांचा अहवाल तपासला असता दिसून येते की, त्यांची भूमिका अशी आहे की, शासनाचे काम प्रत्यक्ष बालशिक्षणात उतरण्याचे नाही. किंबहुना ज्या काही थोडया बालशाळा शासना मार्फत चालतात त्याही शासनाने खाजगी संस्थांकडे सुपूर्द कराव्यात, शिक्षणाचा सर्व व्यवहार समाजाच्या हातातच असावा.

शासनाचे काम फक्त धोरणविषयक चौकट निर्माण करण्याचे आहे. ही चौकट समाजाने स्वीकारावी यासाठी तिला कायद्याचे रूप देण्याचे आहे आणि, या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी, समितीने सुचविल्याप्रमाणे एक राज्यव्यापी नियंत्रण मंडळ 'बालशिक्षण मंडळ' या नावाने एका स्वायत्त संस्थेच्या रूपाने निर्माण करावयाचे आहे आणि त्यावर बालशिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांची नेमणूक करावयाचे आहे.

❖